मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४७९ वा ● शुक्रवार, ता. २६ डिसेंबर २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

# प्रा.नारळीकर यांना मरणोत्तर विज्ञानरत्न सर्वोच्च पुरस्कार

## राष्ट्रपती मुर्मू यांच्या हस्ते वितरण

**नवी दिल्ली । रयत समाचार**

भारत सरकारच्या वतीने विज्ञान आणि तंत्रज्ञानातील उत्कृष्ट योगदानासाठी देण्यात येणाऱ्या राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार २०२५ चे वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते करण्यात आले. प्रसिद्ध खगोल भौतिकशास्त्रज्ञ कै. प्रा. जयंत विष्णू नारळीकर यांना विज्ञान रत्न या सर्वोच्च पुरस्काराने मरणोत्तर सन्मानित करण्यात आले तसेच अन्य दोन श्रेणीमध्य महाराष्ट्रातील ६ शास्त्रज्ञ आणि संशोधकांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. राष्ट्रपती भवनातील गणतंत्र मंडप येथे आयोजित पुरस्कार सोहळ्यात शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आणि संशोधकांना विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोन्मेष या क्षेत्रातल्या उल्लेखनीय योगदानासाठी, विज्ञान रत्न, विज्ञान श्री, विज्ञान युवा आणि विज्ञान टीम, या चार श्रेणींमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आले. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या कोणत्याही क्षेत्रात



आजीवन योगदान देणाऱ्या शास्त्रज्ञांना देण्यात येणारा विज्ञानरत्न पुरस्कार प्रसिद्ध खगोल भौतिकशास्त्रज्ञ कै. प्रा. जयंत विष्णू नारळीकर मरणोत्तर प्रदान करण्यात आला. त्यांच्यावतीने आयुकाचे संचालक डॉ. रघुनाथन श्री आनंद यांनी हा पुरस्कार स्वीकारला. स्व. नारळीकर यांनी होयल-नारळीकर सिद्धांत विकसित करून गुरुत्वाकर्षण आणि द्रव्य निर्मितीचे एकत्रीकरण करणारा स्थिर अवस्था ब्रह्मांडाचा आराखडा मांडला होता. तसेच, क्वासी-स्टेडी स्टेट कॉस्मॉलॉजी मॉडेलद्वारे कॉस्मिक बॅकग्राउंड रेडिएशन आणि दीर्घिकांच्या निर्मितीचे स्पष्टीकरण दिले होते. विज्ञान श्री पुरस्काराने नागपूर येथील राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्थेचे संचालक डॉ. एस. वेंकट मोहन, यांना पर्यावरण विज्ञान आणि अभियांत्रिकी क्षेत्रातल्या उल्लेखनीय योगदानासाठी पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच न्यूट्रॉन बीमलाइन्स आणि सुपरकंडक्टिव्हिटी क्षेत्रातील योगदानासाठी (परमाणु ऊर्जा) डॉ. युसूफ मोहम्मद सेख (, मुंबई यांसह - कृषी विज्ञानसाठी: डॉ. ज्ञानेंद्र प्रताप सिंह (-नॅशनल ब्युरो ऑफ प्लांट जेनेटिक रिसोर्सेस, नवी दिल्ली) जीव विज्ञान क्षेत्रातील मानवी जीनोम सिक्वेन्सिंगद्वारे रोग संवेदनशीलता आणि इतिहासाचे संशोधना साठी डॉ. कुमारसामी थंगराज (-, हैदराबाद), रसायनशास्त्र क्षेत्रात स्वस्त पाणी शुद्धीकरण तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी प्रा. तलाप्पिल प्रदीप ( मद्रास),प्रा अनिरुद्ध भालचंद्र पंडित (इंजीनियरिंग विज्ञान), ; प्रा. महान एमजे (गणित आणि कंप्यूटर विज्ञान); श्री जयन एन (अंतरिक्ष विज्ञान आणि प्रौद्योगिकी)यांना विज्ञान श्री पुरस्कार प्रदान करण्यात आले. विज्ञान युवा या श्रेणीत विविध क्षेत्रांतून अनेक युवा संशोधकांना सन्मानित करण्यात आले, ज्यात भौतिकशास्त्रात प्रा. अमित कुमार अग्रवाल आणि प्रा. सुहृद श्रीकांत मोरे; गणित आणि संगणक विज्ञानात प्रा. सब्यसाची मुखर्जी आणि प्रा. श्वेता प्रेम अग्रवाल; अभियांत्रिकी विज्ञानात प्रा.. आर्कप्रभा बासू; वैद्यकीय क्षेत्रात डॉ. सुरेश कुमार; अंतराळ विज्ञानात अंकुर गर्ग; तंत्रज्ञान आणि नाविन्यात प्रा. मोहनशंकर शिवप्रकाशम, डॉ. जगदीस गुप्ता कपुगंती (कृषि विज्ञान); डॉ. सतेन्द्र कुमार मंगरौठिया (कृषि विज्ञान); देबार्का सेनगुप्ता (जैविक विज्ञान); डॉ. दीपा अगाशे (जैविक विज्ञान); डॉ. दिब्येंदु दास (रसायन विज्ञान); डॉ. वलीउर रहमान (पृथ्वी विज्ञान) यांचा समावेश आहे. अरोमा मिशन टीमला सुगंधी पिकांच्या उच्च उत्पादन देणाऱ्या जाती विकसित करून शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि ग्रामीण रोजगार वाढवल्याबद्दल विज्ञान टीम पुरस्कार प्रदान करण्यात आला.



# पेंचमधील विस्थापितांना न्याय मिळणार

## कणेगाव पुनर्वसनाला कालबद्ध गती

**मुंबई । रयत समाचार**

पेंच अभयारण्यातील न्यू तोतलाडोह गावाच्या पुनर्वसनामुळे विस्थापित झालेल्या नागरिकांना नियमाप्रमाणे सर्व मूलभूत सुविधा देण्याच्या स्पष्ट सूचना मदत व पुनर्वसन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत दिल्या. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पेंच अभयारण्य क्षेत्रातील न्यू तोतलाडोह गावाचे विस्थापन करण्यात आले होते. मात्र वाडंबा येथे स्थलांतरित झालेल्या नागरिकांना केवळ आर्थिक मोबदला व जमिनी देण्यात आल्या असून, पाणी, वीज, रस्ते, आरोग्य, शिक्षण आदी आवश्यक सुविधा अद्याप उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. कायद्यानुसार पुनर्वसन पॅकेजअंतर्गत देय असलेल्या सर्व सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित यंत्रणांनी कार्यवाही करावी, अशा ठोस सूचना राज्यमंत्री जयस्वाल यांनी दिल्या.

विस्थापितांच्या जीवनमानात सुधारणा होणे ही शासनाची जबाबदारी असून त्यात कोणतीही दिरंगाई सहन केली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. याच बैठकीत सांगली जिल्ह्यातील कणेगाव या पूरग्रस्त गावाच्या पुनर्वसनाचा प्रश्नही चर्चेला आला. कणेगाव पुनर्वसनासाठी कालबद्ध कार्यक्रम आखून तो मार्गी लावण्याचे आदेश देण्यात आले. गावठाणातील जुन्या जागेचा रहिवासी वापर करता येणार नाही, या अटीवर त्या जागेची मालकी मूळ मालकाकडे ठेवण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी प्रस्ताव सादर करावा, असे निर्देश देण्यात आले. तसेच ज्यांनी पुनर्वसनासाठी आवश्यक रक्कम भरली आहे आणि स्थलांतरासाठी तयार आहेत, अशा लाभार्थ्यांना एक महिन्याच्या आत जागा वाटपाची प्रक्रिया पूर्ण करावी, असे स्पष्ट आदेश राज्यमंत्री जयस्वाल यांनी दिले.

या निर्णयांमुळे पेंचमधील विस्थापित तसेच सांगलीतील पूरबाधित नागरिकांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# रिकाम्या गाड्यांची कसून तपासणी, सत्ताधाऱ्यांच्या बॅगांना मोकळीक?

## रोहित पवारांची खोचक टीका

**मुंबई । रयत समाचार**

कर्जत- जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी निवडणूक काळातील पोलिस वाहन तपासणीवरून सत्ताधारी यंत्रणांवर खोचक शब्दांत टीका केली आहे. पोलिस अधिकारी वाहनांची तपासणी करत असल्याचा एक व्हिडीओ ता.२५ डिसेंबर रोजी फ सबुकवर पोस्ट करत त्यांनी 'कार्यक्षम' आणि 'तत्पर' निवडणूक आयोगाचे कौतुक करत असल्यासारखी उपरोधिक प्रतिक्रिया दिली. या व्हिडीओसोबत रोहित पवार लिहीतात, सत्ताधारी नेत्यांच्या अवजड बॅगांची तपासणी होत नाही; मात्र विरोधकांच्या, विशेषतः आमच्या रिकाम्या गाड्यांची मात्र कसून तपासणी केली जाते. निवडणूक आचारसंहिता



सर्वांसाठी समान असावी, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. निवडणूक काळात प्रशासनाकडून होत असलेल्या कारवाईत दुजाभाव होत असल्याचा आरोप यानिमित्ताने पुन्हा एकदा चर्चेत आला असून, या व्हिडीओमुळे राजकीय वर्तुळात तीव्र प्रतिक्रिया उमटण्याची शक्यता आहे.



# व्यावसायिक व तंत्र शिक्षण काळाची गरज- पालकमंत्री विखे

**पाथर्डी । नितीन गटाणी**

व्यावसायिक शिक्षण व तंत्र शिक्षण हीच आजच्या काळाची गरज असून राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक वाढत असल्याने औद्योगिक क्षेत्राला कुशल कामगारांची आवश्यकता आहे. ग्रामीण भागात अशा प्रकारच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध झाल्यास तालुका विकासाच्या मुख्य प्रवाहात येऊन दुष्काळावर कायमची मात करणे शक्य होईल, असे प्रतिपादन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले. ते तालुक्यातील निंबोडी येथे स्व. प्रमोद भापसे आयटीआय कॉलेजच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी आमदार मोनिका राजळे, आमदार प्रसाद लाड, विश्वस्त नीता लाड, संगीता भापसे, संभाजी दहातोंडे, नगराध्यक्ष अभय आव्हाड, सुभाष बर्डे, वैभव खलाटे, अजय रक्ताटे, प्रतीक खेडकर, संभाजी पालवे, काशिनाथ लवांडे, उद्धव वाघ, अक्षय कर्डिले, सुनील शिंदे, गणेश हडतगुणे, मंगल कोकाटे, प्रसाद मते, डॉ. उद्धव नाईक आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पालकमंत्री विखे पुढे म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने देशात प्रथमच कौशल्य विकास विद्यापीठ सुरू झाले. उद्योगधंद्यांच्या गरजेनुसार अभ्यासक्रमात बदल होत असून शैक्षणिक क्षेत्रात अमूलाग्र बदल वेगाने सुरू आहेत. जिल्ह्यात शिर्डी येथे एमआयडीसी सुरू झाली असून राहुरी परिसरात दोन हजार एकर क्षेत्रावर लवकरच एमआयडीसीची सुरुवात होणार आहे. सुमारे तीन हजार कोटी रुपयांचे प्रकल्प जिल्ह्यात येत आहेत. येणाऱ्या पिढीची गरज ओळखून त्यांना संधी उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष कृती कार्यक्रम हाती घेतला आहे. केवळ पदवी शिक्षण घेण्यापेक्षा रोजगाराभिमुख शिक्षणावर भर देण्याचा हा कालखंड असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी आमदार मोनिका राजळे म्हणाल्या की, तालुक्याच्या शैक्षणिक विकासात स्व. लोकनेते बाबुराव भापसे यांचे योगदान मोठे आहे. तालुक्याचा दक्षिण भाग उत्तर जिल्ह्याच्या तुलनेत विकासापासून दूर असून ग्रामीण भागात शैक्षणिक उपलब्धता वाढवल्यास विकासाचा वेग वाढेल. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचा आज स्मृतिदिन असून प्रधानमंत्री ग्रामसडक योजना व सर्व शिक्षा अभियान ही त्यांची देशाला मोठी देणगी आहे. त्यांच्या विचारांची शिकवण आत्मसात करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाची वाटचाल सुरू आहे, असे त्यांनी सांगितले. आमदार प्रसाद लाड यांनी संस्थेचे संस्थापक लोकनेते स्व. बाबुराव भापसे व प्रमोद भापसे यांच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाचा आढावा घेतला. उद्धव काळापहाड यांनी सूत्रसंचालन केले, तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून कुशल भापसे यांनी आभार मानले.

# जलतरण स्पर्धेत संजना प्रभुगावंकरची चमकदार कामगिरी

**चेन्नई । प्रभाकर ढगे**

तामिळनाडूतील चेन्नई येथील एसआरएम विद्यापीठात असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज यांच्या अधिपत्याखाली नुकत्याच पार पडलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ जलतरण व डायव्हिंग (पुरुष व महिला) स्पर्धा २०२५-२६ मध्ये ख्रिस्त विद्यापीठ, बेंगळुरूची जलतरणपटू संजना प्रभुगावंकर हिने उल्लेखनीय कामगिरी करत दोन रौप्य व एक कांस्य पदक पटकावले. या स्पर्धेत संजनाने १०० मीटर व २०० मीटर बॅकस्ट्रोक प्रकारात कौशल्य पणाला लावून उत्कृष्ट जलतरण करत रौप्यपदक मिळवले, तर ५० मीटर बॅकस्ट्रोक प्रकारात कांस्यपदकाची कमाई केली. तिच्या



या यशामुळे ख्रिस्त विद्यापीठाच्या संघाचा गौरव वाढला आहे. देशभरातील विविध विद्यापीठांतील नामांकित जलतरणपटूंनी सहभाग घेतलेल्या या स्पर्धेत संजनाने दाखवलेली सातत्यपूर्ण कामगिरी कौतुकास्पद ठरली आहे. स्पर्धेतील तिच्या शर्यतींचे थेट प्रक्षेपण 'All India Inter University Aquatics Championship 2025-26' या यूट्यूब चॅनेलवर पहिल्या, दुसऱ्या व चौथ्या दिवशी प्रसारित करण्यात आले होते. संजना प्रभुगावंकर हिच्या या यशाबद्दल क्रीडाप्रेमी, प्रशिक्षक, कुटुंबीय व मित्रपरिवाराकडून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तिच्या पुढील क्रीडा वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा दिल्या जात आहेत.


# धर्मा प्रॉडक्शन्सचा धक्कादायक निर्णय

## प्रि-रिलीज प्रेस शो बंद; रिलीज दिवशीच पत्रकारांसाठी स्क्रीनिंग

**मुंबई । रयत समाचार**

बॉलिवूडमधील आघाडीची निर्मिती संस्था धर्मा प्रॉडक्शन्सने चित्रपट प्रदर्शन व प्रचाराच्या धोरणात मोठा आणि धाडसी बदल केला. यापुढे धर्माच्या आगामी चित्रपटांसाठी प्रि-रिलीज प्रेस स्क्रीनिंग होणार नाहीत, अशी अधिकृत घोषणा कंपनीने केली.

धर्मा प्रोडक्शन्सने माध्यमांना उद्देशून जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे, गेल्या अनेक दशकांपासून माध्यमांनी दिलेला पाठिंबा, समीक्षा आणि कव्हरेज ही संस्थेच्या यशामागील मोठी ताकद ठरली आहे. मात्र बदलत्या काळात प्रेक्षकांचा चित्रपट




पाहण्याचा अनुभव जसा कल्पित आहे तसाच अबाधित राहावा, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. प्रि-रिलीज शो बंद करण्याचा निर्णय कठीण असला, तरी त्यामुळे चित्रपटाबाबतचा उत्साह, कुतूहल आणि सिनेमाचा अनुभव सर्वांसाठी समान राहील, असा विश्वास धर्मा प्रोडक्शन्सने व्यक्त केला आहे. मात्र माध्यमांच्या वेळेवर मिळणाऱ्या समीक्षणांचे महत्त्व मान्य करत, चित्रपट प्रदर्शित होण्याच्या दिवशीच, दिवसाच्या पहिल्या सहामाहीत माध्यमांसाठी विशेष प्रेस स्क्रीनिंगचे आयोजन करण्यात येणार असल्याचेही कंपनीने स्पष्ट केले आहे. या स्क्रीनिंगमध्ये पत्रकार आणि समीक्षकांना सर्वप्रथम चित्रपट पाहण्याची संधी दिली जाणार आहे. गेल्या अनेक वर्षांत माध्यमांसोबत निर्माण झालेल्या विश्वासाच्या नात्याला आम्ही मोठे महत्त्व देतो आणि पुढील काळातही हे सहकार्य कायम राहील, असे धर्मा प्रोडक्शन्सने नमूद केले. निवेदनावर करण जोहर आणि अपुर्वा मेहता यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# निरंतर शिक्षण जीवनात अत्यंत महत्त्वाचे- अभिनेते सचिन

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

मी गरीब कुटुंबात जन्माला आलो. बालपणातच घरची जबाबदारी स्वीकारावी लागली. त्यामुळे उच्च शिक्षण पूर्ण करता आले नाही. एकदा शिक्षण हातून निसटले की ते पुन्हा सहज मिळत नाही, हे प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहिजे. त्यामुळे निरंतर शिकत राहण्याचा प्रत्येकाने प्रयत्न करावा, असे प्रतिपादन ज्येष्ठ अभिनेते सचिन पिळगावकर यांनी केले.

कॅम्प येथील बी. के. मॉडेल हायस्कूलच्या शताब्दी समारोह सप्ताहानिमित्त बुधवारी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी बेळगाव उत्तरचे आमदार राजू शेठ हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित



होते. सचिन पिळगावकर पुढे म्हणाले की, माझे बालपण अत्यंत गरीब परिस्थितीत गेले. वयाच्या चौथ्या वर्षी अभिनयाला सुरुवात केली. पाचव्या वर्षी बालकलाकार म्हणून राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. सहाव्या वर्षी घरची जबाबदारी स्वीकारावी लागली. चित्रपटांमध्ये काम करत असल्यामुळे शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले; मात्र त्या काळात शिक्षकांनी माझ्या शिक्षणासाठी विशेष मेहनत घेतली. प्रत्येकाच्या आयुष्यात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. चित्रपटसृष्टीतील झगमगाट लोकांना दिसतो; मात्र त्या मागील कष्ट आणि परिश्रम दिसत नाहीत. लोकप्रियता व यश मिळवण्यासाठीही सातत्याने मेहनत करावी लागते. चित्रपटात काम करत असतानाच मी सतत शिकत राहण्याचा प्रयत्न केला. मीनाकुमारी यांच्यामुळे मला उर्दू भाषा शिकता आली. भाषांवर माझे विशेष प्रेम आहे. माणसाने आयुष्यभर शिकत राहिले पाहिजे, असे त्यांनी

> **स्त्री ही पुरुषांपेक्षा सर्वार्थाने श्रेष्ठ आहे. त्यामुळे पालकांनी मुलींच्या शिक्षणाला विशेष महत्त्व दिले पाहिजे.**
>
> **- अभिनेते सचिन**

सांगितले. वयाच्या अठराव्या वर्षी १९७५ मध्ये 'शोले' आणि 'गीत गाता चल' या दोन चित्रपटांत काम करण्याची संधी मिळाली. दोन्ही चित्रपट प्रचंड यशस्वी ठरले. त्यानंतर अनेक चित्रपटांच्या ऑफर्स मिळाल्या. यश मिळूनही योग्य वेळी अधिक शिक्षण घेता आले नाही, याची खंत आजही वाटते. त्यामुळे प्रत्येकाने योग्य वयात योग्य गोष्टी करत राहाव्यात, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी त्यांनी 'शोले' चित्रपटातील क्लायमॅक्स आणि आपल्या मृत्यूच्या दृश्याच्या शूटिंगचा किस्साही सांगितला. आमदार राजू शेठ यांनी आपल्या भाषणात सांगितले की, शाळेचा शताब्दी महोत्सव साजरा होणे ही साधी बाब नाही. या शाळेच्या स्थापनेवेळी संस्थापकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला असेल. बालपणीची मैत्री हीच खरी मैत्री असते. शिक्षक केवळ शिक्षण देत नाहीत, तर राष्ट्रनिर्मितीचे कार्य करतात, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी अविनाश पोतदार यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.




# लोकशाही उत्सव

## अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक - २०२५-२६



### अहिल्यानगर महापालिका निवडणूक

# बदललेले राजकारण, बदललेली गणिते




**रयत समाचार । तुषार सोनवणे**

राज्यातील महानगरपालिका निवडणुकांचा बिगुल वाजल्यानंतर अहिल्यानगर महापालिकेची आगामी निवडणूक विशेष चर्चेत आली. २०२३ मध्ये कार्यकाळ संपल्यानंतर गेली दोन वर्षे प्रशासक राजवटीखाली असलेल्या महापालिकेत आता पुन्हा लोकप्रतिनिधींच्या निवडीची उत्सुकता शिगेला पोहोचली. बदललेल्या पक्षीय समीकरणांमुळे यंदाची निवडणूक अधिकच चुरशीची ठरण्याची चिन्हे आहेत. २००३ साली स्थापन झालेल्या अहमदनगर महानगरपालिकेत गेल्या वीस वर्षांत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि भाजप या सर्वच प्रमुख पक्षांचे महापौर झाले आहेत. कोणत्याही एका पक्षाचे शहरावर दीर्घकाळ वर्चस्व राहिलेले नसल्याने प्रत्येक निवडणूक वेगळ्या राजकीय समीकरणांसह लढवली गेली. रस्ते, पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन, आरोग्य व शिक्षण अशा मूलभूत नागरी प्रश्नांमुळे महापालिकेची सत्ता सर्वच पक्षांसाठी महत्त्वाची ठरते. डिसेंबर २०१८ मध्ये झालेल्या शेवटच्या निवडणुकीत शिवसेना २४ जागांसह सर्वात मोठा पक्ष ठरला होती. राष्ट्रवादी काँग्रेसला १८, भाजपला १४, तर काँग्रेसला ५ जागा मिळाल्या होत्या.

संख्याबळ कमी असतानाही राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठिंब्यावर रा.स्व. भाजपचे बाबासाहेब वाकळे महापौर झाले. त्यानंतर २०२० मध्ये राजकीय समीकरणे बदलली आणि शिवसेनेच्या रोहिणी शेंडगे महापौर झाल्या. मात्र २०१९ नंतर राज्यातील राजकारणात मोठे बदल घडले. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील फोडल्यानंतर अहिल्यानगर महापालिकेतील पक्षीय बलाबल पूर्णपणे बदलले. सध्या भाजपकडे १९, शिवसेना (शिंदेगट) कडे २१, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडे १८ नगरसेवक आहेत. काँग्रेस, बसपा, समाजवादी पार्टी आणि अपक्ष मिळून उर्वरित संख्याबळ आहे. महाविकास आघाडीतील नगरसेवकांची संख्या आता अत्यल्प राहिली असली, तरी आगामी निवडणुकीसाठी आघाडी पुन्हा ताकदीने मैदानात उतरण्याच्या तयारीत आहे. यावेळी ठाकरेंच्या शिवसेनेतील काही, सोबत जुने भाजपावाले आणि ज्यांना राष्ट्रवादी अजित पवार आणि भाजप यांच्याकडून तिकीट मिळणार नाही, असे इच्छुक शहरात तिसरी आघाडी करण्याच्या तयारीत आहेत, अशी माहिती सूत्रांनी दिली. निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याआधीच सर्वच पक्षांनी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती सुरू केल्या होत्या. युती आणि आघाड्यांमध्ये प्रत्येकी तीन-तीन पक्ष असतानाही उमेदवारांची संख्या मोठी असल्याने तिकीट वाटपावरून अंतर्गत स्पर्धा वाढण्याची शक्यता आहे. त्यातच अर्बन बँकेचे भाग्यविधाते गांधी घराणे यांच्या सुनबाईंसाठी अनेक वर्षांपासून मोदींची स्वच्छता मोहिम इमानदारीत राबविणारे अजय चितळे यांच्या पत्नी सोनाली चितळे यांचे तिकीट कापले गेले, अशी माहिती सुत्रांनी दिली. आगामी निवडणूक केवळ महापौरपदापुरती मर्यादित न राहता शहराच्या भविष्यातील राजकीय दिशा ठरवणारी ठरणार असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

## माझी भुमिका, आपले प्रगतीपुस्तक



### निवडणूक सत्तेसाठी नव्हे, विकासासाठी

अहिल्यानगर महानगर पालिका निवडणूक ही केवळ राजकीय स्पर्धा नसून आपल्या परिसराच्या भवितव्यासाठीची एक महत्त्वाची संधी आहे. निवडणूक जिंकण्यासाठी राजकारण करणे माझा उद्देश कधीच नव्हता; तर नागरिकांच्या जीवनात प्रत्यक्ष बदल घडवणारी विकासकामे करणे हाच माझा खरा अजेंडा राहिला आहे. गेल्या दहा वर्षांपासून बोल्हेगाव, नागापूर व उपनगर परिसराचे प्रतिनिधित्व करत असताना मी कधीही द्वेषाचे किंवा फूट पाडणारे राजकारण केले नाही. नेहमीच विकासाला प्राधान्य दिले. याच विकासात्मक दृष्टिकोनामुळे पूर्वी खेड्याचे स्वरूप असलेल्या बोल्हेगाव व उपनगर परिसराचा कायापालट झाला आणि आज येथील नागरिकांना खऱ्या अर्थाने आपण महानगरपालिकेचे रहिवासी आहोत, अशी अनुभूती मिळत आहे. रस्ते, पाणीपुरवठा, वीज, ड्रेनेज, स्वच्छता यांसारख्या मूलभूत सुविधांना कायम प्राधान्य देत ती कामे मार्गी लावण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. आज जर आपण ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधला, तर त्यांनाच पूर्वीचे बोल्हेगाव आणि आजचे बोल्हेगाव यामधील फरक स्पष्टपणे जाणवतो. तो फरक शब्दांत मांडण्याची गरज नाही, तो प्रत्यक्ष अनुभवातून दिसतो. प्रभागातील नागरिकांना २४ तास उपलब्ध असणारा नगरसेवक म्हणून लोक मला ओळखतात, हे मी अभिमानाने सांगतो. समस्या ऐकून घेणे, त्यावर तात्काळ उपाययोजना करणे आणि काम पूर्ण होईपर्यंत पाठपुरावा करणे, हीच माझी कार्यपद्धती राहिली आहे. येत्या निवडणुकीच्या माध्यमातून काही अपूर्ण राहिलेली कामे पूर्ण करण्याचा माझा निर्धार आहे. प्रभागातील नागरिकांसाठी सुसज्ज वाचनालय उभारणे, शहर व औद्योगिक वसाहतीकडे जाण्यासाठी सुलभ अशी शहर बस सेवा उपलब्ध करून देणे, तसेच प्रभागातील युवक व खेळाडूंकरिता आ. संग्राम जगताप यांच्या संकल्पनेतील मिनी क्रीडा संकुल उभारण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. विकास म्हणजे केवळ सिमेंटचे रस्ते नव्हेत, तर शिक्षण, क्रीडा, सार्वजनिक सुविधा आणि सुरक्षित वातावरण यांचा समतोल विकास होय. नागरिकांचा विश्वास हीच माझी खरी ताकद असून, तो विश्वास कायम ठेवत प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी काम करत राहण्याची हीच माझी भूमिका आहे.

**प्रभाग ८**
**कुमारसिंह बबनराव वाकळे**
**९६२७३६२२२२**

### जाहीरात पोस्टर्स कधी काढणार? नागरिकांचा सवाल

# देवाभाऊ बारशाच्या आचारसंहिता भंगाकडे प्रशासनाचे दूर्लक्ष?

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर मनपा निवडणुक आचारसंहिता वाजतगाजत सुरू झाली. प्रशासकांनी अनेक बैठका घेत नियमावली नागरिकांना दिली. अनेक लोकप्रतिनीधींची नावे फोटो असलेली ठिकाणे, विकासकामे पाट्या, बाकड्यांवरील कोरलेली नावे काळी-निळी शाई, रद्दीपेपर लावून झाकून टाकली. कडक आचारसंहिता सुरू झाल्याचे हे प्रथम लक्षण. ''आचारसंहिता भंग करणारांवर गुन्हे दाखल करू'' अशी ग्वाही प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.




परंतु काही दिवसांपुर्वी फडणवीसांच्या देवाभाऊ नावाच्या नविन बारश्याचे पोस्टर्स शहरात अनेक ठिकाणी तसेच आहेत. प्रशासनाचे याकडे ठरवून दुर्लक्ष होत आहे ? अनेक ठिकाणी ही जाहिरात पोस्टर्स आचारसंहिता भंग करत आहेत. याकडे प्रशासन लक्ष देणार का ?

# ख्रिसमस विशेषांकाचे प्रकाशन संपन्न

### 'रयत समाचार'चा सामाजिक- सांस्कृतिक संदेश



**अहमदनगर । रयत समाचार**

दैनिक रयत समाचारच्या ख्रिसमस विशेषांकाचे प्रकाशन बुधवारी ता. २५ डिसेंबर रोजी नाशिक धर्मप्रांत, सीएनआय, अहमदनगर पहिली मंडळीचे प्रिस्ट इन्चार्ज रेव्ह. सतीश तोरणे, रेव्ह. डिकन नूतन कांबळे, प्रसन्ना शिंदे, गिरीश शिरसाठ तसेच विशेषांकाचे विशेष संपादक प्रा. सॅम्युअल वाघमारे यांच्या हस्ते याच चर्चमधे विशेषांकाचे अनावरण करण्यात आले.

ख्रिसमस विशेषांकाचे हे दुसरे वर्ष असून, यंदाच्या अंकाचे संपादन प्रा. सॅम्युअल वाघमारे यांनी केले. अंकात निलिमा जाधव-बंडेलू, रेव्ह. जे.आर. वाघमारे, ज्येष्ठ पत्रकार- संपादक सॉलोमन गायकवाड, इतिहास अभ्यासक भूषण देशमुख, सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी, गोव्याच्या लेखिका सुवर्णा गावकर, सहाय्यक सरकारी अभियोक्ता अंजला नवगिरे अब्राहम, शफीक बागवान, रत्नागिरीचे मि. ब्र. प्रेम व्हिमल, निवृत्त समाजकल्याण अधिकारी रफिक मुन्शी, ब्र. गणेश पवार आदींचे वैचारिक व अभ्यासपूर्ण लेख समाविष्ट आहेत. प्रकाशन सोहळ्याला शमशोन शिंदे, प्रियेश शिरसाठ, सुधीर जाधव, पिटर शिंदे, सुजल शिंदे, उपसंपादक दिपक शिरसाठ, संतोष गायकवाड, तुषार सोनवणे, पंकज गुंदेचा, विजय केदारे, धनंजय गोलवड, चंद्रकांत माळी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी दैनिक रयत समाचारचे मुख्य संपादक भैरवनाथ वाकळे यांनी लेखक, जाहिरातदार आणि सहानुभूतीदारांचे आभार मानत, सामाजिक सलोखा, समता व माणुसकीचा संदेश देणाऱ्या या विशेषांकाच्या यशस्वी प्रकाशनाबद्दल समाधान व्यक्त केले.

## लगीन घाई







**मनपा निवडणूक सुरू झाली तसतसे नविन किस्से समोर येत आहेत. नगर अर्बन बँकेचे माजी चेअरमन तथा कै.खा. दिलीप गांधी यांच्या बंगल्याचे आनंदऋषीजी महाराज साहेब समाधी समोर फुटपाथवर अतिक्रमण होते. त्याची तक्रार विनोद गांधी यांनी केली. अतिक्रमणविरोधी विभागाने नोटीस देवून ते पाडायचे ठरविले, तशी कायदेशिर नोटीस दिली. कै.गांधींनी या विरोधात थेट उच्च न्यायालयातून स्टे मिळविला. यावर विनोद गांधी यांनी प्रचंड पाठपुरावा केला. ही केस पुन्हा अहिल्यानगर जिल्हा न्यायालयात आली. न्यायालयाने अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक यांना वस्तुस्थितीदर्शक अहवाल द्यायला लावला. अंदाजे १०० तारखा उलटूनही मनपा आयुक्तांनी काही न्यायालयास तो अहवाल दिला नाहीच. तक्रारदार गांधी पाठपुरावा करतच होते. शेवटी मनपा निवडणूक लागली आणि चिरंजीव गांधींना मनपात जायची स्वप्ने पडू लागली. त्यास एकच अडचण होती ती म्हणजे कोर्टातील अतिक्रमण तक्रार. रा.स्व.संघ बीजेपीने तिकीट द्यायचा शब्द दिला पण त्यासाठी अतिक्रमण अडचण होते. हे समजल्यावर शेवटी मनानेच अतिक्रमण काढायची मोहिम सुरू झाली. अतिक्रमणविरोधी पथकाने समाधानाचा श्वास घेतला.**

पेस्ट कंट्रोल
झुरळ, डास, मुंग्या, कोळी , पाल, गोम, गोचीड, पिसवा, उंदीर, घुस, लाईटचे किडे, वाळवी, ढेकुन इ.
या साररव्या किटकांपासुन मुक्तता.
औषधाचा वास नाही, रंग नाही, साइड इफेक्ट नाही.
शिवाय घरात जास्त आवरा आवर नाही.
अपेक्स बायोटेक पेस्ट कंट्रोल
जेऊर (बा.), अहिल्यानगर.
संदीप पवार - 98 23 75 17 76

# निवडणुकीसाठी राष्ट्रवादीच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर

## आमदार संग्राम जगताप यांना वगळले

**मुंबई । रयत समाचार**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने (अजित पवार गट) आपल्या स्टार प्रचारकांची यादी महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाकडे सादर केली. ता. १५ डिसेंबर २०२५ रोजी निवडणूक आयोगाने मागविलेल्या माहितीनुसार ही यादी पाठविण्यात आली असून, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी या नियुक्त्या केल्या आहेत.

यादीत पक्षातील ज्येष्ठ व प्रमुख नेत्यांचा समावेश करण्यात आला असून, अजित पवार, प्रफुल पटेल, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, नरहरी झिरवाळ, मकरंद जाधव-पाटील, अदिती तटकरे, अमोल मिटकरी, रूपाली चाकणकर यांच्यासह एकूण ४० नेत्यांची नावे स्टार प्रचारक म्हणून नमूद करण्यात आली आहेत. मात्र या यादीत अलीकडेच वादग्रस्त वक्तव्यांमुळे चर्चेत आलेले अहिल्यानगर शहराचे आमदार संग्राम जगताप यांचे नाव वगळण्यात आल्याने अहिल्यानगर शहरात जोरदार चर्चा रंगली आहे.

रयत समाचार **Classified** छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री | नोकरी विषयक | नावात बदल
आरोग्य विषयक | वाढदिवस | विवाह विषयक

STAR HEALTH
आपण कष्टाने कमावलेला पैसा हॉस्पिटल मध्ये बील भरण्यासाठी आहे का ?
CASH COUNTER
अधिक माहितीसाठी संपर्क
9049860184, 8208235485

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफिसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com **(वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)**

# समाजात शिक्षकाची पत, प्रतिष्ठा अबाधित ठेवणे महत्त्वाचे- बापूसाहेब तांबे

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

ग्रामीण भागातील गोरगरीब मुलांच्या जीवनामध्ये प्रकाश निर्माण करण्याचे कार्य शिक्षक करीत असतात. समाजात शिक्षकाची पत व प्रतिष्ठा अबाधित राहिली पाहिजे. त्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. आपल्या जिल्ह्यात शिक्षकांचे राजकारण केवळ बँकेभोवती फिरते, हे योग्य नाही. शिक्षकांच्या ग्रुपवर काहीही मांडावे; मात्र समाजमाध्यमांवर एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप, चुकीच्या बातम्या टाकू नयेत. अशा प्रकारांमुळे शिक्षकांची सामाजिक प्रतिष्ठा कमी होते. ही प्रतिष्ठा वाढवण्यासाठी सर्वांनी जबाबदारीने वागणे गरजेचे आहे. खाजगी बाबी व वैयक्तिक आरोप टाळावेत, असे आवाहन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे राज्य नेते बापूसाहेब तांबे यांनी केले. जिल्हा शिक्षक बँकेच्या चेअरमनपदी गोरक्षनाथ विटनोर व व्हाईस चेअरमनपदी ज्ञानेश्वर शिरसाठ यांची निवड झाल्याबद्दल श्रीरामपूर शहर व तालुका गुरुमाऊली सदिच्छा मंडळ व मित्र परिवारातर्फे सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून तांबे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षक बँकेचे माजी चेअरमन व विकास मंडळाचे विद्यमान विश्वस्त सलीमखान पठाण होते. यावेळी जिल्हा शिक्षक



संघाचे अध्यक्ष बबन गाडेकर, शिक्षक बँकेचे माजी चेअरमन रामेश्वर चोपडे, विकास मंडळ सल्लागार समितीचे अध्यक्ष भास्कर, माजी व्हा. चेअरमन बाळासाहेब कापसे, जिल्हा संघाचे सरचिटणीस विठ्ठल काळे, नेवासा तालुका अध्यक्ष बापूसाहेब सोनवणे, शिवाजी घुले, नामदेव शिरसाठ, कोकाटे, केंद्रप्रमुख बाबासाहेब पिल्लर, शाखाधिकारी जाकीर शेख, माध्यमिक शिक्षक संघाचे नेते फारुक सय्यद आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

तांबे पुढे म्हणाले की, २०१६ पासून आजपर्यंत शिक्षक बँकेत काटकसरीचा, पारदर्शक व शिक्षकहिताचा कारभार करण्यात आला आहे. पूर्वी केवळ एक टक्का डिव्हिडंड मिळत होता; आमच्या कार्यकाळात जास्तीत जास्त डिव्हिडंड देण्यात आला. २०१६ साली बँकेच्या कर्जाचा व्याजदर ११ टक्के होता, तो आज ८.४० टक्क्यांवर आणण्यात आला असून काही कर्जांसाठी तो ७.९० टक्के आहे. आरबीआयच्या निर्देशानुसार स्टाफिंग पॅटर्नमध्ये बदल करण्यात आला आहे. बँकेसंबंधी सर्व निर्णय आमसभेत घेतले जातात.

सभासदांच्या सूचनांची अंमलबजावणी निश्चितपणे केली जाईल, असे त्यांनी सांगितले. यावेळी एससीआरटीचे संचालक राहुल रेखावार यांनी शिक्षकांच्या विविध प्रश्नांबाबत भूमिका मांडली. जिल्हा संघाचे अध्यक्ष बबन गाडेकर यांनी संघटनात्मक कामकाजाविषयी आपले विचार व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात सलीमखान पठाण यांनी बापूसाहेब तांबे यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले.फ्फ कार्यक्रमास बाबाजी डुकरे, प्रदीप दळवी, पांडुरंग पटारे, वाघुजी पटारे, सर्जेराव देवरे, मुकुंद कारले, एकनाथ रहाटे, निलेश राजवळ, श्रीकांत झिंजुर्डे ,शरद पवार ,रमेश गायकवाड, एकनाथ आव्हाड, देविदास कल्हापुरे ,सचिन शिंदे ,फ्रान्सिस हिवाळे, दिलीप शेंडे, कुमार कानडे, कुमार शेवाळे, बाबासाहेब थोरात, शाकीर शेख, सोमनाथ शेंडे, चंद्रकांत पंडित, सुनील बागुल, बाबासाहेब घुले,रवींद्र पाटोळे,जयराम पठारे,गणेश काटोले, श्याम पठारे, शाखाधिकारी जाकीर शेख, दीपक कुलकर्णी, संजय बोरसे, बापू भोर आदि उपस्थित होते. कार्यक्रमात स्वागत जिल्हा संघाचे नेते चंद्रकांत मोरे यांनी केले. प्रस्ताविक तालुका गुरुमाऊली मंडळाचे अध्यक्ष संतोष वाघमोडे यांनी मांडले. सूत्रसंचालन गोकुळ औटी यांनी केले तर आभार राजेश बनकर यांनी मानले. कार्यक्रमास जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील शिक्षक, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच व्यावहारिक ज्ञानाची गरज- बबनराव पाचपुते

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानापुरते मर्यादित न ठेवता व्यवहारिक ज्ञान देणे अत्यंत आवश्यक आहे, असे मत राज्याचे माजी मंत्री बबनराव पाचपुते यांनी व्यक्त केले. ते श्रीगोंदा तालुक्यातील गणेशवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आयोजित बाल आनंदी बाजार तसेच आधुनिक डिजिटल लॅब व ग्रंथालयाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी पाचपुते म्हणाले की, मुख्याध्यापक आबासाहेब जगताप यांच्या प्रयत्नांमुळे शाळेचा संपूर्ण चेहरामोहरा बदलला आहे. बाल आनंदी बाजाराचे स्वरूप पाहून आपण थक्क झालो असल्याचेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांची विद्यार्थ्यांनी घेतलेली मुलाखत विशेष आकर्षण ठरली. या मुलाखतीदरम्यान पाटील यांनी विद्यार्थी दशेत असताना शिक्षणाधिकारी होण्याचे पाहिलेले स्वप्न कसे साकार झाले, हे सांगितले. त्यांची उत्तरे ऐकून विद्यार्थी व ग्रामस्थ भारावून गेले. यावेळी उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात पाटील यांचे कौतुक केले.

या कार्यक्रमास श्रीगोंदा पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी कुसुमकुमारी कानडी,

**अतिशय लहान असलेल्या गणेशवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक आबासाहेब जगताप यांनी योग्य नियोजन करून बाल आनंदी बाजाराला केवळ बाजाराचे नव्हे, तर यात्रेचे स्वरूप दिले होते. जंपिंग झोपाळे, मिकी माऊस, खेळण्यांची दुकाने तसेच प्रमुख पाहुण्यांच्या स्वागतासाठी दोन उंटांची व्यवस्था करण्यात आली होती. शाळा स्थापन झाल्यापासून प्रथमच असा भव्य-दिव्य कार्यक्रम झाल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.**

शिक्षण विस्तार अधिकारी निलकंठ बोरुडे, माजी शिक्षण विस्तार अधिकारी सिताराम भुजबळ, आबासाहेब कोल्हटकर, ज्ञानदेव खरात, पंचशिलाताई गिरमकर, आनंदवाडीच्या सरपंच छाया ढमढेरे, उपसरपंच विठ्ठल गिरमकर, माजी उपसरपंच रमेश गिरमकर, मंगल जाधव, मातोश्री रुग्णालयाचे डॉ. नवनाथ लाड, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संपतराव खरात, सुनिल खरात, दरेकर, केंद्रप्रमुख हनुमंत भूकन, नवभारत माध्यमिक विद्यालय आनंदवाडीचे मुख्याध्यापक सुनिल गिरमकर, अंगणवाडी सेविका सुनिता भोसले, सिमा पाचपुते आदी मान्यवर उपस्थित होते.

# विज्ञान प्रदर्शन विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव देणारे व्यासपीठ- प्रा. मिसाळ

**पाथर्डी । नितीन गटाणी**

सध्याचे युग हे विज्ञान व तंत्रज्ञानाचे युग आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या मनातील कल्पक कल्पनांना वाव देण्यासाठी योग्य व्यासपीठ मिळणे अत्यंत आवश्यक आहे. त्या दृष्टीने तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन हे एक महत्त्वाचे व उपयुक्त व्यासपीठ ठरू शकते, असे प्रतिपादन संत ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सुरेश मिसाळ यांनी केले. पंचायत समिती शिक्षण विभाग, विज्ञानगणित अध्यापक संघटना आणि संत ज्ञानेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पाथर्डी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५३ व्या तालुकास्तरीय विज्ञानगणित प्रदर्शनाच्या समारोपप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.फ यावेळी व्यासपीठावर शिक्षणाधिकारी शिवाजीराव कराड, शिक्षण विस्तार अधिकारी तथा प्रदर्शन प्रमुख रामनाथ कराड, शिक्षण विस्तार अधिकारी अनिल भवार, निलेश क्षिरसागर, सहदेवदादा शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव महेंद्र शिरसाट, विज्ञान अध्यापक संघाचे अध्यक्ष सुनील कटारिया, गणित अध्यापक संघाचे अध्यक्ष राजू पवार यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी संपत घारे, सतीश बडदे, चंद्रकांत उदागे,



आदिनाथ शिदोरे, धर्मराज शिरसाट, संतोष लोव्हाडे, अरुण नेहूल, सुभाष सोनवणे, सुनील शिरसाट, विविध विद्यालयांचे मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. याशिवाय गहिनीनाथ शिरसाट, बाळासाहेब गोल्हार, सुनील खेडकर, अशोक कराड, रामदास दहिफळे, राजेंद्र जायभाय, बाळासाहेब वामन, मुजीब इनामदार, भास्कर बारगजे, राहुल अकोलकर, संतोष कुसाळकर, अण्णासाहेब फलके, सीताराम सावंत आदी मान्यवर उपस्थित होते. जिल्हा विज्ञान अध्यापक संघटनेचे सदस्य सुनील कटारिया यांनी विज्ञानगणित अध्यापक संघटनेमार्फत वर्षभर विद्यार्थ्यांच्या हितासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. विज्ञान स्पर्धा परीक्षा आयोजनासह शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी संघटना सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते बक्षीसपात्र विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रामनाथ कराड यांनी केले. सूत्रसंचालन संतोष काळोखे व पौर्णिमा नऱ्हे यांनी केले, तर आभार महेंद्र शिरसाट यांनी मानले. प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी भास्कर बारगजे, अशोक कराड, गहिनीनाथ शिरसाट, कल्याण लवांडे, सुरेश खेडकर, सीताराम सावंत, नवनाथ चौधर, गंगाधर सुपेकर, कृष्णा दराडे, शिवाजी ढाकणे, आत्माराम दहिफळे, सुनील शिरसाट, सुभाष सोनवणे, सुनील खेडकर आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# काँग्रेस गटनेतेपदी मुजफ्फर शेख

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

काँग्रेसच्या गटनेतेपदी ज्येष्ठ नगरसेवक माजी उपनगराध्यक्ष हाजी मुजफ्फर शेख यांची निवड करण्यात आली आहे. मुजफ्फर शेख हे विद्यमान नगरसेवकांमध्ये सर्वात ज्येष्ठ आणि जुने तसेच काँग्रेस आणि ससाने कुटुंबीयांशी अत्यंत निष्ठावान असलेले नगरसेवक आहेत. पक्षाने त्यांच्यावर थेट गटनेते पदाची सर्वात मोठी जबाबदारी टाकली आहे. पालिकेच्या सर्व त्या प्रश्नांसंदर्भात त्यांचा मोठा गाढा अभ्यास आहे. गेल्या सहा पंचवार्षिक निवडणुकीपासून ते काँग्रेस आणि ससाणे कुटुंबीयांशी प्रामाणिक आहेत. स्व. जयंत ससाने हे सर्वात प्रथम नगराध्यक्ष झाल्यापासून तर आजतागायत मुजफ्फर शेख हे ससाणे यांच्याकडेच आहेत. पालिकेच्या झालेल्या निवडणुकीत प्रभाग ५ मधून ते मोठ्या मताधिक्याने निवडून आले. राजकीय काळोखात ससाणे यांच्यापासून अनेक जण जरी दुरावले असले तरी एकमेव मुजफ्फर शेख हे ससाणे कुटुंबीयांशी निष्ठेने आहेत. निष्ठा आणि स्वाभिमान याची पावती म्हणून मुजफ्फर शेख यांच्यावर पहिलीच सर्वात मोठी जबाबदारी टाकण्यात आली. पालिकेच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने नगराध्यक्ष करण ससाणे यांच्यासह २० नगरसेवक हे काँग्रेसची निवडून दिली



आहेत.

गेल्या १४ वर्षापासून पालिकेत काँग्रेस विरोधी पक्ष म्हणून कार्यरत होता. दरम्यान, मुजफ्फर शेख यांच्या गटनेते पदावरील निवडी बाबत माजी मंत्री बाळासाहेब थोरात, आ. हेमंत ओगले, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन गुजर, माजी नगराध्यक्ष राजश्री ससाणे, नगराध्यक्ष करण ससाने, काँग्रेसच्या राष्ट्रीय सचिव दिपाली ससाने, श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर नवले, काँग्रेसचे शहर अध्यक्ष अण्णासाहेब डावखर ,दिलीप नागरे, राजेंद्र पवार, योगेश जाधव, रईस जहागिरदार, कलीम कुरेशी, लकी सेठी, सुभाष पोटे, दिपक वमने, बिट्टू कक्कड, निलेश नागले, संतोष परदेशी, रितेश एडके, अफरोज शहा, प्रवीण कोठावळे, अभिजित लिप्टे, सिद्धार्थ सोनवणे, सागर कुऱ्हाडे, भाग्येश लोखंडे, अतुल शेटे यांच्यासह कृषी उत्पन्न बाजार समितीचे सर्व संचालक जिल्हा परिषद पंचायत समितीचे आजी माजी सर्व सदस्यांनी अभिनंदन केले.



# मोहम्मद रफी जयंती उत्साहात साजरी

**नेवासा । विजय खंडागळे**

पार्श्वगायक मोहम्मद रफी यांची १०३ वी जयंती सोनई येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सोनई संगीत रसिक ग्रुपच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळपासून दिवसभर रफी यांची अनेक दर्दभरी, भावस्पर्शी गीते सादर करण्यात आली. या गीतांनी श्रोत्यांसह सोनईकरांना संगीताचा मनमुराद आनंद दिला. जन्मदिनानिमित्त प्रारंभी रफी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) जिल्हा उपाध्यक्ष जालिंदर येळवंडे, कार्यकर्ते अनिल शेटे, मुळा बँकेचे अध्यक्ष भाऊसाहेब निमसे, तुकाराम निमसे, अशोक टेलर, शंकरराव निमसे, प्रवीण परदेशी, सचिन कल्हापुरे, शकील बागवान, मुरलीधर निमसे, पुरुषोत्तम कुलकर्णी, जावेद शेख, शशी वैरागर, अल्ताफ शेख, फिरोज पठाण, आकाशवाणीचे निवेदक व वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष संजय वैरागर, उदय कर्डक, विलास पटारे, किशोर दरंदले, भाऊसाहेब गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते. दरवर्षी स्व. मोहम्मद रफी यांची पुण्यतिथी व जयंती साजरी करून श्रोत्यांना त्यांच्या अजरामर गीतांचा आस्वाद देणारे रफीप्रेमी महंमद भाई सय्यद हे गेल्या ३५ वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबवत आहेत. त्यांच्या या संगीतसेवेबद्दल ग्रामस्थांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

# मोबाईलचा अतिवापर टाळण्यासाठी पालकांनी लक्ष द्यावे- देशमुख

## स्वामी विवेकानंद विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**नगर तालुका । रयत समाचार**

नवनागापूर येथील स्वामी विवेकानंद विद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन व बक्षीस वितरण कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. बबनराव डोंगरे होते, तर प्रमुख वक्ते म्हणून कथालेखक बाळासाहेब देशमुख यांना विशेष आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना देशमुख म्हणाले की, सध्याच्या काळात मुलांमध्ये वाचनसंस्कृती वाढविणे ही काळाची गरज आहे. मोबाईलच्या अतिवापरामुळे अनेक मुले त्याच्या आहारी जात असून पालकांनी याकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. मुलांना मोबाईलपासून दूर ठेवून पुस्तकांकडे वळविले पाहिजे. वाचनाची गोडी लागल्यास



विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व समृद्ध होऊन त्यांचा सर्वांगीण विकास साधता येतो, असेही त्यांनी नमूद केले. देशमुख पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपले आयुष्य घडविण्यासाठी चार महत्त्वाची सूत्रे आत्मसात करणे आवश्यक आहे. त्यामध्ये गुरुजनांच्या आज्ञा पाळणे, चांगली संगत ठेवणे, मोबाईलपासून दूर राहणे आणि किमान चार पुस्तके वाचण्याची आवड जोपासणे या बाबींचा समावेश आहे. ही चार सूत्रे अंगीकारल्यास विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य, कला, संस्कृती व जीवनमूल्यांचा विकास निश्चितच होऊ शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमास एमआयडीसी पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी, वडगाव गुप्ताचे प्रथम लोकनियुक्त सरपंच विजय शेवाळे, प्रा. शिवाजीराव घाडगे, कोषाध्यक्ष सुनंदा डोंगरे, माध्यमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सत्यभामा शिंदे, प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका हौसाबाई कोतकर, भाजपचे तालुका कार्याध्यक्ष रामभाऊ घाडगे, ग्रामपंचायत सदस्य सागर सप्रे, दीपक गिते, मंगलताई गोरे, वडगाव गुप्ता विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन बाबासाहेब डोंगरे, दैनिक आकर्षणचे सहसंपादक तुकाराम कामठे, लोकमतचे खासेराव साबळे तसेच प्रसिद्ध नाट्य अभिनेते रियाज पठाण आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक पोपट कातोरे यांनी केले. शैक्षणिक, क्रीडा व विविध स्पर्धांमध्ये नैपुण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा यावेळी पारितोषिक वितरण करून सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी नृत्य, गीत व नाट्य अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणास उपस्थितांनी भरभरून दाद दिली. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका हौसाबाई कोतकर यांनी उपस्थित मान्यवर, पालकवर्ग, शिक्षक व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

# महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत, व्यासंगी व्यक्तिमत्व डॉ. मनमोहन सिंग



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

भारताचे माजी पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग यांची आज पुण्यतिथी. दोन वर्षापूर्वी २६ डिसेंबर २०२४ रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत आणि व्यासंगी व्यक्तिमत्त्व हरपले. त्यांनी देशासाठी जे योगदान दिले देश कधीही ते विसरणार नाही. त्यांच्या निधनाने भारताची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. आज भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था मानली जाते. याचे सर्व श्रेय डॉ. मनमोहन सिंग यांनाच जाते कारण तीस बत्तीस वर्षापूर्वी ते देशाचे अर्थमंत्री असताना देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी त्यांनी जे क्रांतिकारी निर्णय घेतले त्यामुळेच देशाची अर्थव्यवस्था सुदृढ झाली.

डॉ. मनमोहन सिंग हे रूढ अर्थाने राजकारणी नव्हते तरीही त्यांनी समर्थपणे दहा वर्ष देशाचे नेतृत्व केले. त्यांनी देशासाठी दिलेले योगदान खूप महत्वाचे आहे. २६ सप्टेंबर १९३२ रोजी एका गरीब कुटुंबात डॉ. मनमोहन सिंग यांचा जन्म झाला. ते लहान असतानाच त्यांचे मातृछत्र हरपले. घरची परिस्थिती हलाखीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. पंजाब विद्यापीठातून आपले उच्च शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांनी १९५७ साली केंब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयातून पहिल्या श्रेणीत पदवी मिळवली. त्यानंतर त्यांनी १९६२ साली ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या नफिल्ड महाविद्यालयातून अर्थशास्त्र विषयात डी फिल ही पदवी संपादन केली. उच्च शिक्षण घेऊन ते मायदेशात परतल्यावर त्यांनी पंजाब विद्यापीठ तसेच दिल्ली स्कूल ऑफ इकोनॉमिक्समध्ये प्राध्यापक म्हणून सेवा केली. अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. एक विद्यार्थीप्रिय प्राध्यापक अशी त्यांची ओळख होती. याच दरम्यान युएनसिटीडी सचिवालयात त्यांनी काम पाहिले. अर्थशास्त्रातील विद्वान व्यक्ती अशी त्यांची ख्याती जगभर पसरू लागली. त्यामुळे १९७१ साली त्यांना वाणिज्य मंत्रालयाचे आर्थिक सल्लागार ही जबाबदारी देण्यात आली. पुढील वर्षी म्हणजे १९७२ साली त्यांची अर्थ मंत्रालयात प्रमुख आर्थिक सल्लगार म्हणून नेमणूक झाली. अर्थ विभागाचे प्रमुख सल्लागार म्हणून त्यांची कामगिरी उल्लेखनीय राहिली. पुढे त्यांनी अर्थ मंत्रालयाचे सचिव, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार, विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष अशा महत्वाच्या पदावर त्यांनी काम केले. १९८७ ते १९९० या काळात त्यांनी जिनिव्हा येथील साऊथ कमिशनचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले.

१९९० पासून भारतीय राजकारणात अनेक मोठ्या घडामोडी घडत होत्या. राजकारण अस्थिर झाले होते. विश्वनाथ प्रताप सिंग यांचे सरकार पडले होते. चंद्रशेखर हे भारताचे पंतप्रधान बनले होते. भारताची अर्थव्यवस्था बिकट बनली होती. देश चालवण्यासाठी सरकारकडे पैसे नव्हते सरकारी तिजोरीत ठणठणाट होता म्हणून पंतप्रधान चंद्रशेखर यांनी देशाचे हजारो टण सोने जागतिक बँकेकडे गहाण ठेवले होते. केवळ भारतच नव्हे तर संपूर्ण जगातच आर्थिक मंदी आली होती. अनेक देश डबघाईला आले होते अशातच काँग्रेसने चंद्रशेखर यांचा पाठिंबा काढून घेतल्याने लोकसभेच्या निवडणुका लागल्या होत्या. निवडणूक प्रचार दरम्यानच राजीव गांधी यांची हत्या झाल्याने काँग्रेसचे सूत्रे पी व्ही नरसिंहराव यांच्याकडे आली. त्या निवडणुकीत काँग्रेसने सर्वाधिक जागा जिंकल्याने नरसिंह राव पंतप्रधान बनले. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेताच कॅबिनेट सचिव नरेश चंद्र यांनी त्यांना आठ पानांचा अहवाल दिला. या अहवालात देशाची आर्थिक स्थिती अत्यंत वाईट असल्याचे नमूद करण्यात आले होते. अशा परिस्थितीत राव यांना अशा चेहऱ्याची गरज होती जो आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि त्यांच्या विरोधकांना भारत आता जुन्या मार्गावर जाणार नाही असा संदेश देऊ शकेल. त्यांनी त्यावेळी त्यांचे सल्लागार पी सी अलेक्झांडर यांना विचारले की अर्थ मंत्रालयासाठी आंतरराष्ट्रीय मान्यता असलेल्या व्यक्तींचे नावे सुचवा तेव्हा पी सी अलेक्झांडर यांनी आय जी पटेल व डॉ मनमोहन सिंग यांची नावे सुचवली. आय जी पटेल यांची आई आजारी असल्याने ते भारतात येऊ शकणार नाही मात्र डॉ मनमोहन सिंग यांना संपर्क केल्यास देशहीतासाठी ते अर्थमंत्री होतील असे पी सी अलेक्झांडर यांनी पंतप्रधानांना सांगितले. लगेचच नरसिंह राव यांनी डॉ मनमोहन सिंग यांच्याशी संपर्क केला आणि तुम्ही माझ्या मंत्रिमंडळात अर्थमंत्री होताल का? असे विचारले. मनमोहन सिंग यांनी त्यास होकार दिला आणि डॉ मनमोहन सिंग भारताचे अर्थमंत्री बनले. अर्थमंत्री म्हणून त्यांनी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी त्यांनी खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण धोरण आणले. अर्थमंत्री म्हणून त्यांनी देशाची अर्थव्यवस्था सुधारलीच नाही तर ती वेगवान केली. त्या काळात डॉ मनमोहन सिंग यांना जागतिक पातळीवर सर्वोत्कृष्ट अर्थमंत्री म्हणून संबोधले जात असे. त्यांनी जागतिक बँकेकडे गहाण ठेवलेले सोने परत आणले. देशाच्या तिजोरीत भर घातली. देशात परदेशी गुंतवणूक आणली त्यामुळे देशाची अर्थव्यवस्था तर सुधारलीच पण तरुणांना रोजगार देखील मिळाला. त्यांच्या उदारीकरणाच्या धोरणाला जगाने मान्यता दिली म्हणूनच त्यांना जागतिक उदारीकरणाचे जनक असे म्हणतात. १९९६ साली काँग्रेसचे सरकार गेल्यावर ते राज्यसभेत विरोधी पक्षनेते बनले. मे २००४ साली झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले त्यावेळी सोनिया गांधी याच देशाच्या पंतप्रधान होतील असे सर्वांना वाटले पण सोनिया गांधींनी आपला आतला आवाज ऐकून पंतप्रधानपद नाकारले आणि डॉ मनमोहन सिंग यांची पंतप्रधानपदी निवड केली. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या काळातही त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. देशातील एकही व्यक्ती उपाशी झोपू नये म्हणून त्यांनी अन्न सुरक्षा सारखे महत्वाचे विधेयक आणले. सर्वांना रोजगार मिळावे म्हणून त्यांनी मनरेगा योजना आणली. त्यांच्या पंतप्रधान काळात परराष्ट्राशी भारताचे सौहार्दाचे संबंध होते. त्यांच्याच काळात भारत आणि अमेरिका यांचे संबंध दृढ झाले. सर्वसामान्य जनतेच्या हिताचे अनेक निर्णय घेतल्यानेच जनतेने त्यांना दुसऱ्यांदा पंतप्रधान बनण्याची संधी दिली. २००४ ते २०१४ असे सलग दहा वर्ष ते भारताचे पंतप्रधान होते. सलग दहा वर्ष देशाचे पंतप्रधान राहूनही ते कायम नम्र आणि विनयशील राहिले. अहंकाराचा लवलेशही त्यांना शिवला नाही. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. अर्थशास्त्रावर आधारित ग्रंथ लिहिले. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. त्यांना अनेक विद्यापीठांनी मानाची डॉक्टरेट दिली. देशाचा दुसरा सर्वोच्च पुरस्कार पद्मविभूषण त्यांना प्राप्त झाला. त्यांच्या निधनाने देशाने एक महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत, व्यासंगी व्यक्तिमत्त्व, अभ्यासक आणि थोर देशभक्त गमावला आहे. त्यांच्या कामाप्रती असलेला व्यासंगी आणि शैक्षणिक दृष्टिकोन, जनसामान्यांसाठी असलेली उपलब्धता व विनम्र आचारणामुळे ते कायम स्मरणात राहतील. डॉ मनमोहन सिंग यांना पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन!

# कष्ट, प्रयत्न, सातत्यामुळे यशाचे शिखर गाठता येते– बाळकृष्ण गोटीपामूल

## नाथ विद्या मंदिर विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**अहमदनगर । विजय मते**

वर्षातून एकदा विद्यार्थ्यांच्या मेहनतीचे, गुणवत्तेचे व यशाचे कौतुक होण्याचा दिवस म्हणजे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ होय. या मंचावरून विद्यार्थ्यांबरोबरच पालकांनाही प्रेरणा मिळते. यश सहज मिळत नाही; त्यासाठी कष्ट, प्रयत्न आणि सातत्य आवश्यक आहे.




ही त्रिसूत्री अंगीकारली तरच यशाचे शिखर गाठता येते, असे प्रतिपादन मार्कंडेय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे माजी प्राचार्य बाळकृष्ण गोटीपामूल यांनी केले. वसंत टेकडी येथील सेवा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री. नाथ विद्या मंदिर विद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व विविध गुणदर्शन कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून बाळकृष्ण गोटीपामूल उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी कासार पिंपळगाव येथील छत्रपती शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य दादासाहेब भोईटे होते. यावेळी माजी प्राचार्या डॉ. रेखा राणी खुराना, प्राचार्य डॉ. श्याम पंगा, डॉ. वेणु कोला, संदीप कांबळे, प्राचार्या अनुराधा चव्हाण, सविता सानप, सुचित्रा डावरे, विजया नवले, मीरा नराल आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या 'गगन भरारी' या हस्तलिखिताचे प्रकाशन करण्यात आले. गोटीपामूल पुढे म्हणाले की, सेवा शिक्षण प्रसारक संस्थेची शैक्षणिक वाटचाल ही सर्वसामान्य पालकांसाठी शिक्षणाची सेवा देणारी आहे. प्राथमिक शिक्षणापासून सुरू झालेली ही संस्था आज इंजिनिअरिंग, फार्मसी, आयुर्वेद अशा विविध व्यावसायिक शिक्षण शाखांपर्यंत विस्तारली आहे, ही अभिमानाची बाब आहे. तंत्रज्ञानाच्या युगात स्पर्धा वाढली असून या स्पर्धेत टिकण्यासाठी सतत अद्ययावत राहणे आवश्यक आहे. मोबाईल व संगणकाचा वापर केवळ मनोरंजनापुरता न ठेवता शिक्षण, ज्ञानवृद्धी व प्रगतीसाठी करावा. वाचनाची आवड जोपासावी. 'श्यामची आई' या पुस्तकातून साने गुरुजींनी आईचे महत्त्व व संस्कारांचे मोल अधोरेखित केले. शिक्षकांचा व वडीलधाऱ्यांचा सन्मान ठेवा, पर्यावरणाचे रक्षण करा, चांगली संगत ठेवा आणि देशाला अभिमान वाटेल असे नागरिक बना, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. अध्यक्षीय भाषणात दादासाहेब भोईटे म्हणाले की, पालकांनी प्रत्येक गोष्ट सहज उपलब्ध करून दिल्यास मुले लाडावतात. त्यामुळे पालकांनी काही गोष्टींसाठी 'नाही' म्हणण्याची सवय लावली पाहिजे. प्रास्ताविकात मुख्याध्यापिका अनिता सिद्दम यांनी वर्षभर राबविण्यात आलेल्या शालेय व सहशालेय उपक्रमांचा आढावा घेतला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्य व विविध कलागुणांचे सादरीकरण केले. गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके वितरित करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वर्षा कबाडी यांनी केले तर आभार मीनाक्षी यन्नम यांनी मानले.

# सावंतसाहेब : संघर्ष, मूल्यनिष्ठा आणि माणुसकीचा जीवनप्रवास





सुखदेव काळे
दापोली, रत्नागिरी
९७६६७७३८५०

**प्रासंगिक**

रोटरी क्लबच्या वतीने ज्येष्ठ समाजवादी नेते, चळवळींचे मार्गदर्शक आणि अकोले तालुक्याच्या सामाजिक, राजकीय इतिहासातील महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व मा. दशरथ नामदेव सावंत अर्थात सावंतसाहेब यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. या सन्मानानिमित्त समाजातील विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, सावंतसाहेबांच्या कार्यकर्तृत्वाचा आणि मूल्याधिष्ठित जीवनप्रवासाचा पुन्हा एकदा गौरव केला जात आहे. सावंतसाहेब हे समाजवादी चळवळ, शेतकरी संघटना आणि अकोले तालुक्यातील असंख्य आंदोलनांचे अग्रणी नेतृत्व म्हणून ओळखले जातात. मोर्चे, संघर्ष, शेतकरी प्रश्न, सामाजिक न्याय यासाठी त्यांनी आयुष्यभर झगडत राहून राजकारणापेक्षा समाजकारणाला अधिक प्राधान्य दिले. १९७६-७७ या काळात आम्ही संगमनेर येथे शिक्षणासाठी वास्तव्यास असताना सावंतसाहेबांचा सहवास अनेक तरुणांना लाभला. केवळ प्राथमिक शिक्षण झालेले असतानाही टाईम्स ऑफ इंडिया, इलस्ट्रेटेड विकली यांसारखी इंग्रजी वर्तमानपत्रे वाचणारा हा माणूस प्राध्यापकांशी विविध विषयांवर संदर्भासहित चर्चा करत असे. त्या वयात विषय समजण्यापलीकडे असले तरी विचारांची खोली, वाचनाची सवय आणि मुद्देसूद मांडणी यामुळे सावंतसाहेबांविषयी कुतूहल व आदर निर्माण झाला. एकदा दापोली येथे त्यांच्या मुलाच्या महाविद्यालयीन प्रवेशाच्या निमित्ताने आले असता, तत्कालीन कुलगुरू डॉ. पी.व्ही. साळवी यांच्याशी त्यांची भेट घडवून आणली. संथ पण ठाम लयीत विषय मांडणाऱ्या सावंतसाहेबांच्या संवादशैलीने कुलगुरूंनाही आश्चर्यचकित केले होते. संगमनेर साखर कारखान्याचे संचालक असताना त्यांनी शेती, नर्सरी आणि ग्रामीण विकासातील प्रयोग प्रत्यक्ष पाहिले. डॉक्टरची पदवी असूनही शेतीत उतरलेले डॉ. कोपरकर आणि त्यांनी उभारलेली नर्सरी पाहून सावंतसाहेब भारावून गेले होते.

त्यांच्यातील जिज्ञासा आणि शिकण्याची वृत्ती अखेरपर्यंत कायम राहिली. गावाकडे भेट झाली की सावंतसाहेब, प्रा. मोरे सर, कॉ. मधुकर नवले यांच्यासोबत चर्चा रंगत. कधी शेतावर पेरणी करताना, कधी भुईमुगाच्या शेंगांच्या ढिगावर कंदिलाच्या प्रकाशात जे. कृष्णमुर्ती यांचे पुस्तक वाचताना दिसणारे सावंतसाहेब हे 'नेतृत्व' आणि 'काम' यातील दरी मिटवणारे व्यक्तिमत्त्व होते. वयाची ८४ वर्षे पूर्ण झाली असली तरी नुकतेच प्रकाशित झालेले त्यांचे 'साखर गुलामी' हे पुस्तक त्यांच्या वैचारिक ताजेपणाची साक्ष देते. पुस्तकावर सही करताना थरथरणारा हात पाहून काळाचा भान येते; मात्र विचारांची धार आजही तितकीच तीव्र आहे. ''आजही मी ऊसाला दारे धरतो, वेळ पडल्यास,'' हे त्यांचे वाक्य केवळ कष्टाचे नाही तर जमिनीशी नाळ जोडून ठेवलेल्या माणसाचे प्रतीक आहे. समाजकारणातून राजकारणात गेले, पण मूल्ये, नैतिकता आणि संघर्षाशी कधीही प्रतारणा न करणाऱ्या मोजक्या लोकांपैकी सावंतसाहेब एक आहेत. १९९२ साली प्रकाशित झालेले 'पाऊस, पाणी आणि पाण्याचा शोध' हे पुस्तक लेखक म्हणून मी सावंतसाहेबांना अर्पण केले, हेच त्यांच्या वैचारिक प्रभावाचे द्योतक आहे. तरुण वयात व्यक्तिमत्त्व घडवणारा हा प्रभाव आजही अनेकांच्या स्मरणात, चर्चेत आणि अभिमानात टिकून आहे. रोटरी क्लबच्या जीवनगौरव पुरस्काराने केवळ एका व्यक्तीचा नव्हे, तर मूल्यनिष्ठ, संघर्षशील आणि समाजाभिमुख जीवनप्रवासाचा गौरव झाला आहे.

(लेखक दापोली येथील बा.सा.कृषी विद्यापीठ निवृत्त आहेत)

# राष्ट्रीय शालेय कुराश स्पर्धेत ऋचा बोगा हिला कास्यपदक

**अहमदनगर । समीर मन्यार**




उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या ६९व्या राष्ट्रीय शालेय कुराश स्पर्धेत अहिल्यानगर येथील यंग मेन्स जुडो हॉलची खेळाडू ऋचा राकेश बोगा हिने उल्लेखनीय कामगिरी करत महाराष्ट्र संघासाठी कास्यपदकाची कमाई केली. ऋचाची राष्ट्रीय स्पर्धे साठी निवड ही २७ नोव्हेंबर रोजी इंदापूर येथे झालेल्या राज्यस्तरीय कुराश स्पर्धेत १४ वर्षांखालील ४४ किलो वजनगटात सुवर्णपदक पटकावल्यामुळे झाली होती. यापूर्वीही तिने ज्युडो व कुराश या खेळप्रकारांत सातत्यपूर्ण यश संपादन केले. सध्या ऋचा ही अहिल्यानगर येथील भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलमध्ये इयत्ता नववीत शिक्षण घेत आहे. तिला यंग मेन्स जुडो हॉलचे प्रशिक्षक व मार्गदर्शक प्रा. संजय धोपावकर, महाराष्ट्र कुराश असोसिएशनचे अध्यक्ष अंकुश नागर तसेच आदित्य धोपावकर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल आमदार संग्राम जगताप, धनंजय जाधव, न्यू कॉलेजचे प्राचार्य एम. एम. तांबे, मुख्याध्यापक दुगड, प्रा. कैलास साबळे, प्रा. करपे, रमेश बोगा, श्रीकांत छिंदम, राजेंद्र बोगा, सुशांत जाधव, ज्ञानेश्वर गालपेल्ली, अमर येमूल, निर्मला बोगा, पल्लवी बोगा तसेच सर्व नातेवाईक व क्रीडाप्रेमींनी ऋचाचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# ससाणेंच्या पदभाराला २९चा मुहूर्त; बाळासाहेब थोरात यांची उपस्थिती

**श्रीरामपूर । शफीक बागवान**



बहुचर्चित आणि उत्सुकता शिगेला पोहोचलेल्या श्रीरामपूर नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदाचा पदभार नूतन नगराध्यक्ष करण ससाणे हे सोमवार, ता. २९ रोजी स्वीकारण्याचे संकेत मिळाले आहेत. दरम्यान, या सोहळ्यास काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात उपस्थित राहण्याची शक्यता आहे. राज्यभरासह जिल्ह्याचे लक्ष वेधून घेणाऱ्या या निवडणुकीमुळे काँग्रेस येथे अजरामर झाली. राज्य आणि जिल्ह्यात कोणचीही लाट असली तरी येथे मात्र ससाणे कुटुंबीयांचाच वरचष्मा राहिला आहे. स्व. जयंत ससाणे यांच्यापासून श्रीरामपूर नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदाच्या कारकिर्दीस ससाणे कुटुंबीयांनी केलेली सुरुवात ती काही अपवाद वगळता आजतागायात कायम आहे. गेल्या ३५ ते ४० वर्षांपासून श्रीरामपूर नगरपालिकेवर फडकत असलेला काँग्रेस पक्षाचा झेंडा आजही कायम आहे.अतिशय रोमहर्षक पद्धतीने नगराध्यक्ष पदाच्या झालेल्या अटीतटीच्या निवडणुकीत करण ससाणे यांनी विरोधकांना धूळ चारली. निवडणुकीनंतर नाताळ सणाची सुट्टी आणि मुहुर्तामुळे ससाणे नगराध्यक्ष पदाचा पदभार घेऊ शकले नव्हते; मात्र आता ते सोमवारी आपल्या नगराध्यक्ष पदभार स्वीकारणार आहेत. काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात हे या गोड समारंभास उपस्थित राहणार असल्याची शक्यता आहे. यासह इतरही काँग्रेसची काही बडीमंडळी येथे येऊ शकतात. जिल्ह्यात काँग्रेसचे पंजा चिन्ह नामशेष झाले असताना करण ससाणे यांनी मात्र हे चिन्ह अबाधित ठेवले आहे. ससाणे आणि त्यांच्या सर्व टीमने केलेल्या किमयाची काँग्रेस श्रेष्ठींनी दखल घेतली असून ससाणे यांचे जिल्हयासह राज्यभरातील काही श्रेष्ठींनी भ्रमणध्वनीवरून अभिनंदनही केले आहे. अगोदर आमदार हेमंत ओगले यांनी विधानसभेत विजयश्री मिळविल्यानंतर नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीकडे अनेक राजकीय पक्षांचे लक्ष लागले होते. अनेकांच्या अंदाजानुसार येथे बदलाची चर्चा होत असताना ससाणे यांच्या निवडीमुळे त्यास पूर्णविराम मिळाला आहे.